## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

**अपिल क्रमांक : के.आर-२७६/२०२१**

**अपिलार्थी, श्री. अभय हरिशचंद्र पाटील**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत कार्यालय किहिम,
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०८

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.),**
पंचायत समिती कार्यालय अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १८.५.२०२२**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २.३.२०२० | १०.८.२०२० | १७.६.२०२० | १४.८.२०२० |

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि.१७.९.२०२० रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १८.५.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी आणि विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलिय प्राधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले की, त्यांनी दिनांक २.३.२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये, "ग्रुप ग्रामपंचायत किहीम अंतर्गत राबविलेल्या योजना प्रोसिडिंग आवक-जावक, भेट वही, बँक पासबुक इ. दप्तराची शिक्क्यानिशी प्रमाणित प्रत मिळण्याबाबत." अशा प्रकारची माहिती मागीतली होती. सदर माहिती त्यांना मिळालेली नाही. यास्तव द्वितीय अपिल दाखल केले आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी असे सादर केले की, त्यांनी दिनांक १०.८.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना, "माहिती अधिकारातील २ मुद्दयाची माहिती आपणांस देण्यात आली असून उर्वरित मुद्दयांची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात तयार करून ठेवली आहे. तरी आपण सुट्टीचा दिवस सोडून ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत येऊन सदरची माहिती घेऊन जावे." असे कळविले आहे.

प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१४.८.२०२० रोजी सुनावणी घेऊन, अपिलकार यांना दि.१४.८.२०२० रोजी सुनावणीचे दिवशी मोफत माहिती देणेत आलेली आहे त्यामुळे सदरचे अपिल निकाली काढणेत येत आहे असा निर्णय दिलेला आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी दि.२.३.२०२० रोजी व प्रथम अपिल सुनावणी दिवशी म्हणजे दि.१४.८.२०२० रोजी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिलेली आहे. परंतु सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान झाले नसल्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आता अपिलार्थीस सदर माहितीचे निरिक्षण देणे उचित होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय किहिम यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस नोंदणीकृत पोच देय डाकेने पत्र पाठवून प्रस्तुत प्रकरणाशी संबंधित माहिती अर्जासंदर्भात कार्यालयात उपलब्ध अभिलेख/कागदपत्र अवलोकनासाठी दिनांक व वेळ कळवावी. अपिलार्थी यांनी अवलोकन केल्यानंतर त्यांनी चिन्हांकित करुन दिलेल्या २५ पानांपर्यंतच्या कागदपत्रांच्या प्रती समक्ष नि:शुल्क पुरवाव्यात. उर्वरित कागदपत्रांच्या पानांकरीता विहित शुल्क आकारावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १८ मे, २०२२

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

संगणक-१०